# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 08.12.2025 वार- सोमवार**

---

**<u>पुरंदर विमानतळ</u>**

पुरंदर इथल्या प्रस्तावित छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या शेतकरी आणि ग्रामस्थांशी पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी आज चर्चा केली. जमिनीचा दर, मोबदला आणि अन्य विविध मागण्यांबाबत यावेळी चर्चा झाली. प्रकल्पबाधितांच्या मागण्यांबाबत राज्य सरकार सकारात्मक आहे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या संदर्भात लवकरच प्रतिनिधी मंडळाची बैठक घेणार आहेत, अशी माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली. उपजिल्हाधिकारी कल्याण पांढरे, यांच्यासह विविध अधिकारी यावेळी उपस्थित होते. भूसंपादन प्रक्रिया पूर्ण पारदर्शकतेने राबवण्यात येईल, कोणावरही अन्याय होणार नाही, सर्व प्रकल्पग्रस्त नागरिकांना भूसंपादन, पीक सर्वेक्षण याबाबतची माहिती नियमितपणे दिली जाईल, असं डूडी यांनी सांगितलं.

**<u>लोकशाही दिन</u>**

पुण्याचे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या विभागीय लोकशाही दिनात तीन प्रकरणांवर सुनावणी घेण्यात आली. अर्ज निकाली काढण्यासाठी स्थानिक प्रशासकीय यंत्रणेने तत्परतेने कार्यवाही करावी, असे आदेश विभागीय आयुक्तांनी यावेळी दिले.

**शांतता पुणेकर**

पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयाच्या येत्या 13 ते 21 डिसेंबर या कालावधीत होणाऱ्या पुणे पुस्तक महोत्सवा अंतर्गत उद्या सकाळी 11 ते 12 या वेळात शांतता पुणेकर वाचत आहेत, हा उपक्रम होणार आहे. या उपक्रमात सर्वांनी सहभागी व्हावं असं आवाहन आयोजकांनी केलं आहे. पुण्यातील सर्व शासकीय अधिकारी, कर्मचा-यांनी देखील यात सहभागी व्हावं आणि आपलं छायाचित्र क्युआर कोडवर अपलोड करावं असं आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केलं आहे.

**अपघात ग्रस्त शेतकरी**

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेत आता ऑनलाईन अर्ज करता येणार आहे. अर्ज स्वीकृतीनंतर आता हे अनुदानही 'महाडीबीटी' पोर्टलमार्फत थेट ऑनलाईन मिळणार आहे. या पूर्वी ऑफलाईन स्वीकारल्या जाणाऱ्या अर्ज प्रक्रियेतील सर्व टप्पे काढून प्रक्रिया डिजिटल करण्यात आली असल्याची माहिती कृषी विभागानं दिली आहे.

**प्राथमिकआरोग्यकेंद्र**

पुणे जिल्ह्यात प्राथमिक आरोग्य केंद्रांची सेवा अधिक सक्षम करण्यासाठी जिल्हा प्रशासन प्रयत्नशील आहे. त्याचाच एक भाग म्हणून आता रात्रीच्या वेळी पर्यवेक्षण करण्याकरता एका पथकाची नियुक्ती केली आहे. रात्रीच्या वेळी आरोग्य केंद्रांमध्ये डॉक्टर किंवा इतर कर्मचारी उपस्थित नसतील तर संबंधितांवर प्रशासकीय कारवाई होणार असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रामचंद्र हंकारे यांनी दिली आहे.

**कौशल्यप्रशिक्षण**

पिंपरी चिंचवड शहरातील १८ ते ३० वयोगटातील युवक युवतींना रोजगार सक्षम बनवण्यासाठी त्यांना कौशल्य प्रशिक्षण देणं आणि त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध

करून देण्याच्या दृष्टीनं महापालिकेनं विविध भागात लाईट हाऊस केंद्र तयार केली आहेत. आज किवळे इथं एक नवीन लाईट हाऊस केंद्र सुरू करण्यात आलं. पिंपरी चिंचवड महापालिका आणि लाईटहाऊस कम्युनिटीज फाऊंडेशन संयुक्तपणे हा उपक्रम राबवत आहेत. येत्या दोन वर्षात २० हजार युवकांना रोजगार किंवा स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचं उद्दिष्ट महापालिकेनं ठेवलं आहे. आजपर्यंत १० हजारपेक्षा अधिक युवकांनी कौशल्य प्रशिक्षण घेतलं असून ४ हजार ८०० युवकांना रोजगार किंवा स्वयंरोजगार मिळाला आहे.

**<u>अनाथमुले</u>**

नसरापूर इथल्या माऊली अनाथाश्रमातील अनाथ मुलांनी पुणे दर्शन सहलीतून ऐतिहासिक पुण्याचा वारसा आज जाणून घेतला. सोपान मोरे फाउंडेशनचे ऋतुराज मोरे यांच्या संकल्पनेतून ही सहल आयोजित केली होती. या सहलीत मुलांनी कसबा गणपती, लाल महाल, शनिवार वाडा आणि शिवाजीनगर इथली एव्हिएशन गॅलरी अशा विविध ऐतिहासिक आणि महत्त्वाच्या स्थळांची माहिती करून घेतली. तसंच पुणे मेट्रोमधून प्रवास केला आणि पु ल देशपांडे उद्यानालाही भेट दिली. सामाजिक बांधिलकीतून अशा उपक्रमांचे आयोजन केल्याचे फाउंडेशनचे अध्यक्ष ॲड. ऋतुराज मोरे यांनी सांगितले.

**<u>पुरस्कार</u>**

मराठी तसंच उर्दू आणि हिंदी काव्याच्या अभ्यासक शलाका गोळे-गाडगीळ यांना ज्येष्ठ साहित्यिक आणि माजी संमेलनाध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांच्या हस्ते विश्वकवी नारायण सुर्वे पुरस्कार नुकताच पुण्यात प्रदान करण्यात आला. कविवर्य नारायण सुर्वे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त साहिर लुधियानवी फौंडेशनच्यावतीने हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. आपल्या कवितेतून कामगारांचा आणि शोषितांचा हुंकार व्यक्त करणारे नारायण सुर्वे हे खऱ्या अर्थाने विश्वकवी होते, असं मत लक्ष्मीकांत देशमुख यांनी यावेळी व्यक्त केलं. यावेळी शलाका गोळे यांनी शकील बदायुनि यांच्या रचना सादर केल्या.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज किमान तापमान 11 पूर्णांक 3 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं, उद्याही साधारणपणे असंच तापमान राहण्याचा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता ताज्या पुणे वृत्तांत मध्ये, नमस्कार.**